# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- ३०२९/२०२३

**अपिलार्थी, श्री.शैलेश के. गटलेवार,**
सी ४/४, गंगा को.ऑ.हौ.सोसा., लि,
भूखंड क्र. १३, सेक्टर १६, पिल्लई कॉलेज जवळ,
नवीन पनवेल, नवी मुंबई ४१०२०६.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्पलेक्स, टॉवर नं. ०८, ५वा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्पलेक्स, टॉवर नं. ०८, ५वा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.

**व्दितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०३.११.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २८.०२.२०२३ | -- | ०४.०५.२०२३ | ०७.०६.२०२३ |

अपिलार्थी यांनी दि. २८.०८.२०२३ रोजीच्या अर्जान्वये *" The Appellant belives that Section (19) of the RTI Act permits any person to appeal before the Honorable Commission if he has been refused access to any information requiested under this act or he believes that he has been given incomplete, misleading, o r false information under this Act or PIO has obstructed in any manner in furnishing the information. "* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०३.११.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी व प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" CERTIFIED COPY OF various documents of Ganga CHS Ltd. Sector 16 new Panvel 410206*

1) *Bank Account Statement, with supporting document Bills, Vouchers along with purpose Debit and or withdrawal of amount.*
2) *Balance sheet and Income & Expenditure Statement, and payment details of contractor for repair of Ganga Building.*
3) *The Agenda, minutes book recording proceedings of General Meeting, committee meetings, cash book, members list.*
4) *Register of Auditors objection and rectifications, members Register etc.*
5) *The complete clip of video shoot of AGM meeting held on 26.09.2021 and mobile shoot on 17.10.2021.*
6) *Any other correspondences an or documents pertaining to Ganga CHS Ltd.*
7) *Copies of Returns furnished to the office of Registrar CIDCO CBD BELAPUR.*
8) *CCTV Footage on removal of notice from notice board on or after 29th August 2022 and CCTV Footage of 21.05.2022 at 1.00 am and 12.30 pm and 22.02.2022 at 14.00 hrs. complete.*
9) *Roznama for complain by Mr.Gatlewar.*
10) *Reply of letter dated 05.12.2022 received by your office on 09.12.2022 and reminder on 13.02.2023."*

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल.यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ०४.०५.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१०.१२.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०३ नोव्हेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्पलेक्स, टॉवर नं. ०८, ५वा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी
अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको,
शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,
बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्पलेक्स, टॉवर नं. ०८, ५वा मजला,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४. **यांचे मार्फत रवाना.**

**सुनावणी दिनांक १०.१२.२०२५ ( In Continuation of order dt. ०३.११.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.०३.११.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १०.१२.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणी आयोगाने विद्यमान जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित यांना अपिलार्थी यांना १५ दिवसात विनामुल्य माहिती पुरविणेबाबत आदेशित केले होते. तथापि विद्यमान जन माहिती अधिकारी हे आजच्या सुनावणीस उपस्थित नाहीत व त्यांनी अपिलार्थी यांना कोणतीही माहिती पुरविली नाही. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित यांना अपिलार्थी यांना विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबाबत खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी हे आजच्या सुनावणीस उपस्थित नाहीत व त्यांनी माहिती पुरविण्याबाबत झालेल्या विलबासाठी कोणताही खुलासा सादर केला नाही.

सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, नवी मुंबई या कार्यालयातील जन माहिती अधिकारी हे आयोगाकडे सुनावणीसाठी अनुपस्थित राहत असल्याचे दिसून येते. त्यामुळे पुढील सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.राजेंद्र वीर, सह निबंधक, सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, नवी मुंबई यांनी स्वत: उपस्थित राहून, आयोगाच्या दि.०३.११.२०२५४ रोजीच्या आदेशाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणे योग्य होईल.

तसेच तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, नवी मुंबई यांनी आयोगाच्या दि.०३.११.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबाबतचा खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.राजेंद्र वीर, सह निबंधक, सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, नवी मुंबई यांनी आयोगासमोर पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून, आयोगाच्या दि.०३.११.२०२५४ रोजीच्या आदेशाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, नवी मुंबई यांनी आयोगाच्या दि.०३.११.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबतचा त्यांचा लेखी खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा.
३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२३.०२.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० डिसेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.राजेंद्र वीर, सहनिबंधक,
सहकारी संस्था, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,
बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्पलेक्स, टॉवर नं. ०८, ५ वा मजला,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्पलेक्स, टॉवर नं. ०८, ५वा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी
अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको,
शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,
बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्पलेक्स, टॉवर नं. ०८, ५वा मजला,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४. **यांचे मार्फत रवाना.**

राज्य माहिती आयोग
कोंकण खंडपीठ

**सुनावणी दिनांक २३.०२.२०२५ ( In Continuation of order dt. १०.१२.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.१०.१२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.राजेंद्र वीर, सह निबंधक, सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, नवी मुंबई यांना त्यांचा अहवाल सादर करणेबाबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २३.०२.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.राजेंद्र वीर, सह निबंधक तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शरद वाघमारे, सहकारी अधिकारी श्रेणी-१ अधिन सहनिबंध, सहकारी संस्था, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, नवी मुंबई उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले आहे. ज्यामध्येत्यांनी अशी मागणी केली आहे की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नसल्यामुळे, जन माहिती अधिकारीयांचेवर शास्ती आकारण्यात यावी.

प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.राजेंद्र वीर, सह निबंधक, सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, नवी मुंबई यांनी असे निवेदन केले की, उप निबंधक, सहकारी संस्था सिडको यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून प्राप्त करुन घेण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे. सदरची माहिती एक महिन्यामध्ये प्राधिकृत अधिकाऱ्यांमार्फत उपलब्ध करुन, अपिलार्थी यांना देण्यात येईल. त्यांच्या या निवेदनाची नोंद घेण्यात येत आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती पुरवून त्याबाबतचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी सादर करणे योग्य होईल.

तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.जान्हवी म्हात्रे, क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, नवी मुंबई यांनी आयोगाच्या दि.०३.११.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांचा माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबातचा खुलासा सादर केला नाही. त्यांना त्यांचा खुलासा सादर करण्यासाठी एक संधी देण्यात येत आहे. त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी त्यांचा लेखी खुलासा सादर करणे योग्य हाईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती ३० दिवसात शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी व त्याबाबतचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून आयोगासमोर सादर करावा.**
२. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.जान्हवी म्हात्रे, क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, नवी मुंबई यांनी आयोगाच्या दि.०३.११.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबतचा त्यांचा लेखी खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.
३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.३०.०३.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २३ फेब्रुवारी, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.जान्हवी म्हात्रे, क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्पलेक्स, टॉवर नं. ०८, ५वा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी
अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको,
शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,
बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्पलेक्स, टॉवर नं. ०८, ५वा मजला,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४. **यांचे मार्फत रवाना.**

राज्य माहिती आयोग
कोंकण खंडपीठ

**सुनावणी दिनांक ३०.०३.२०२६ ( In Continuation of order dt. २३.०२.२०२६)**

**विवेचन**

उपरोक्त दि.२३.०२.२०२६ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ३०.०३.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.शरद वाघमारे, सहकार अधकारी श्रेणी-१, सहकारी संस्था सिडको उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी सहनिबंधक, सहकारी संस्था सिडको, नवी मुंबई यांनी त्यांचा अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, दिनांक १४.०९.२०२३ पूर्वीच्या पत्रव्यवहारांच्या सर्व धारिका उपनिबंधक व सहाय्यक निबंधक सिडको कार्यालयाकडे आपोआप वर्ग झाल्या असल्याने तत्पुर्वीच्या मूळ माहिती अधिकार अर्जाचे अनुषंगाने संबंधित अर्जदार यांना विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहती उपलब्ध करुन देण्यात अडचणी निर्माण होत आहेत. सबब सदर कालावधीतील माहिती उपलब्ध करुन देणेचे अनुषंगाने या कार्यालयामार्फत संबंधित निबंधक कार्यालयास लेखी पत्राद्वारे सूचना निर्गमित केल्या आहेत.

सहनिबंधक, सहाकारी संस्था सिडको यांचया या अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अद्यापपावेतो अपिलार्थी यांना माहिती दिलेली नाही. अपिलार्थी यांना माहिती देण्याचे आदेश आयोगाने दि.०३.११.२०२५ रोजी पारित केले आहेत. त्यानंतर तीन वेळा याप्रकरणात सुनावणी घेण्यात आली आहे. तथापि अद्यापपर्यंत जन माहती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती दिलेली नाही. ही वस्तुस्थिति आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना माहिती पुरविली नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.जान्हवी म्हात्रे, क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, नवी मुंबई यांनी आयोगाच्या आदेशाप्रमाणे माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबाबतचा कोणताही खुलासा सादर केलेला नाही. तसेच त्या आजच्या सुनावणीस देखील अनुपस्थित आहेत. यावरुन त्यांना कोणताही खुलासा सादर करावयाचा नाही असे स्पष्ट होते. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.जान्हवी म्हात्रे, क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित यांचेवर द्वितीय अपील क्रमांक के.आर.३८१५/२०२३ या प्रकरणात शास्ती आकारण्यात आलेली असल्याने, त्यांचेवर याप्रकरणात शास्ती आकारण्यात येत नाही. त्यांचेवरील प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शरद वाघमारे, क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २५.०९.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाच्या आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२२.०६.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० मार्च, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शरद वाघमारे,
क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको,
शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,
बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्पलेक्स, टॉवर नं. ०८, ५वा मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४. **यांचे मार्फत रवाना.**

राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ

## सुनावणी दिनांक २२.०६.२०२६ ( In Continuation of order dt.३०.०३.२०२६)

## विवेचन

उपरोक्त दि.३०.०३.२०२६ रोजीच्या आदेशानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या आदेशानंतरही माहिती न पुरविल्यामुळे, झालेल्या विलंबाबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २२.०६.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी हे त्यांना सुनावणीची सूचना प्राप्त होऊन देखील ते अनुपस्थित आहेत. तसेच त्यांनी आयोगाच्या आदेशानंतर माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबातचा खुलासा सुध्दा सादर केलेला नाही. त्यांना खुलासा सादर करण्यासाठी एक शेवटची संधी देण्यात येत आहे. त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आपला खुलासा सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शरद वाघमारे, क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित यांनी आयोगाच्या दि.३०.०३.२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे आयोगाच्या आदेशानंतरही माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबातचा खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.३०.०७.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ जून, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शरद वाघमारे,
क्षेत्र अधिकारी अधिन सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको,
शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,
बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्पलेक्स, टॉवर नं. ०८, ५वा मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४. **यांचे मार्फत रवाना.**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ